CCI NG 3.7 Product: TOIPuneBS PubDate: 03-08-2020 Zone: PuneCity Edition: 1 Page: TOIPUC5 User: padmashree.pande Time: 08-03-2020 00:11 Color: K

TIMES NATION
THE TIMES OF INDIA, PUNE | MONDAY, AUGUST 3, 2020

CHIRAG HAILS RAM TEMPLE CONSTRUCTION, SAYS HE IS DESCENDANT OF 'MATA SHABRI'

SONIA, ADMITTED TO GANGA RAM ON JULY 30, HAS BEEN DISCHARGED FROM THE HOSPITAL

Job factors force 2/3rd of migrants to seek future in cities again: Survey

'29% Of Migrants Back In Cities, 45% Plan To Do So'

Ambika.Pandit@timesgroup.com

TOWARDS WORKLAND

New Delhi: A survey of 4,835 households from rural India across 11 states to assess the impact of the lockdown and how the hinterland is unlocking points towards reverse migration, prompted by absence of skilled employment in villages, and is reflected in nearly 2/3rd of migrants having either returned to cities or expressing the wish to do so.

The data shows that of the 1,196 households with migrants who were working in other cities, 74% returned to their villages due to the circumstances arising out of the pandemic and that 29% have already returned to metros. Also 45% of those still in the village think they will move back to the city.

While one-fourth of those back in cities are looking for work, there is better news with a drop in number of people making do with fewer meals and there is evidence that welfare nets are working as 85% accessed the public distribution system, 71% households had LPG (85% through Ujjwala yojana) with many recieving refills. The survey, however, shows only 38% recieved transfers under the PM Kisan scheme.

The survey is a collaborative study by the Aga Khan Rural Support Programme (India), Action for Social Advancement, Grameen Sahara, i-Saksham, PRADAN, SAATHI-UP, SeSTA, Seva Mandir and Transform Rural India Foundation with research support from Vikas Anvesh Foundation and Sambodhi.

Noting that welfare measures seem to have reached a considerable section of beneficiaries and unlocking of economy has brought some cheer to the hinterland, the report cautions "distress incidence is still high" and risk of Covid-19 in rural India is rising. It is pointed out that 1 in 4 household thinks that it might need to take their child out of school but perceptions are better than what they were during lockdown.

An earlier round of survey was carried out in April and around 4,200 households are the same. As far as food consumption patterns go, in the first round of survey 50% households said that they were having fewer number meals a day, this time 43% households said so. Also those eating fewer items in meals was 68% in the first survey and it is down to 55% in this round.

Even though a large percentage of the surveyed households have claimed to be eating fewer meals and fewer items, the survey takes note that over two survey rounds the decline reflects "considerable improvement" and points out that lower incidence of buying in the market, 56% compared to 78% in round 1 of the survey, can be attributed to sufficient grains from PDS.

The data also shows that more than 80% of returned migrants were engaged mainly in labour work and more than 1/4th of those who returned were still searching for work.

The survey was carried out between June 24 and July 8 across 48 districts in Jharkhand, Madhya Pradesh, Assam, Bihar, Chhattisgarh, Gujarat, Uttar Pradesh, West Bengal, Odisha, Rajashtan and Tripura. It is also pointed out that women are experiencing much higher workload with many more rounds required to fetch water and fuelwood due to higher demand in households where migrants have returned.

Govt: Icr migrants back home, just 2.4L outside

Swati.Mathur@timesgroup.com

New Delhi: Close to one crore migrant workers have reached their home states since the coronavirus-induced lockdown was imposed across the country, and only 2.4 lakh migrants remain outside, new Union labour ministry data suggests. The data, released by the chief labour commissioner on July 16, bases its calculations on information provided by only 25 out of 36 state governments and Union Territories administrations, who updated information about migrant workers and shared the details.

This is only the second time the Union labour ministry has released migrants' information since May, when the government launched a 'National Migrant Information System' under which it directed all states to register migrants' details on the online portal. States like Jharkhand, Odisha, Uttarakhand and Himachal Pradesh, which are understood to account for sizeable populations of migrant workers, have not shared any updated data. Even though the chief labour commissioner had sought exhaustive information about the migrants inlcuding their names, age, mobile numbers, occupation, details of migrants' current and native address, bank, Ujjwala and Aadhaar details of workers, the data available in public domain remains sketchy and limited to those who have returned home and those who have stayed back in destination states.

Full report on www.toi.in

STATE OF MIGRANT LABOURERS IN INDIA

Migrants who have reached home: **98.9 lakh**

Migrants still in destination states: **2.4 lakh**

- Information received from 25 states and UTs of the total 36 there are
- Among 11 states/ UTs that have not shared data are: Ladakh, Jharkhand, Uttarakhand, Odisha, Chhattisgarh, Chandigarh, Goa and Himachal Pradesh
- States that said all migrants have returned home: UP (32.5 lakh), West Bengal (13.9 lakh), Tamil Nadu (72,145), Rajasthan (13.1 lakh), MP (7.4 lakh) and Bihar (15 lakh)

(Source: Chief Labour Commissioner, as on July 16)

Beaten in front of kin, TN painter kills self

Chennai: A police inspector has been suspended here after a 40-year-old man who he allegedly roughed up died after setting himself ablaze.

The victim, a painter, was jobless due to the lockdown and could not pay rent to his landlord for about three months, following which the latter preferred a police complaint. During enquiry, the inspector from Puzhal police limits allegedly harassed and roughed up the victim, Srinivasan, in front of his family, following which he attempted self-immolation on Saturday, police said. He was rushed to a hospital but succumbed to the injuries on Sunday.

The inspector has since been placed under suspension. PMK founder S Ramadoss slammed the incident and demanded the arrest of the policeman concerned. Many landlords were compassionate with tenants unable to pay their rent due to the lockdown -triggered job-loss but the house owner in this case making a police complaint was 'inhuman' and so was the response of the suspended policeman, he said in a statement.

He demanded the state government pay Rs 25 lakh as compensation to the victim's family. AGENCIES



Free Mehbooba from 'illegal detention': Rahul

TIMES NEWS NETWORK

New Delhi: Congress MP Rahul Gandhi on Sunday demanded the release of former Jammu & Kashmir chief minister Mehbooba Mufti from "illegal detention", saying democracy is damaged when government detains political leaders, illegally.

Mufti has been in detention under the stringent Public Safety Act since Article 370 was nullified on August 5 last year, revoking special status to J&K and bifurcating the erstwhile state into two Union Territories. Though many other political leaders in Kashmir have since been freed, Mufti's detention under PSA was given a three month extension by the government.

"India's democracy is damaged when GOI illegally detains leaders. It's high time Mehbooba Mufti is released," Gandhi said on Twitter.

Last week, Rahul made a similar plea for the release of senior INC leader Saifuddin Soz after the latter's sensational videos — speaking to the media from behind corcertina wires installed on his bungalows walls — went viral on social media. While the J&K administration has submitted in Supreme Court that Soz is free, the 82-year-old Congress veteran had claimed otherwise.

Congress kept Farooq dad in jail for 11 years: BJP

New Delhi: Reacting to Rahul Gandhi's demand for release of former Jammu & Kashmir CM Mehbooba Mufi, BJP general secretary Bhupender Yadav on Sunday reminded the Congress leader of how Sheikh Abdullah was kept in jail for 11 years by the Congress government.

"Sheikh Abdullah was kept in jail for 11 years. Just some history trivia I want Rahul Gandhi to apprise himself of," Yadav tweeted.

People's Democratic Party (PDP) leader Mufti has been in detention under the Public Safety Act (PSA) since J&K's special status under Article 370 was revoked in August last year and the state was bifurcated into the Union Territories of J&K and Ladakh. TNN

Ayodhya DM hands over five-acre plot for mosque

Arshad Afzaal Khan | TNN

Ayodhya: Ahead of 'bhoomi pujan' ceremony for Ram Temple, Ayodhya district magistrate Anuj Kumar Jha handed over the five-acre land mandated by the Supreme Court in lieu of Babri Masjid to Sunni Waqf Board on Saturday. A delegation of Indo-Islamic Cultural Foundation (IICF) – the trust formed recently by the Sunni Waqf Board for construction of the mosque at Dhannipur village in Faizabad – met the Ayodhya district magistrate at his residence on Saturday.

The delegation was led by Sunni Waqf Board's president Zufar Faruqi and chief executive officer Sayyad Mohammad Shoib. "The district magistrate formally handed over the possession of land for the mosque to the Trust members by giving the certified copy of revenue record ('khatauni')," Shoib told **TOI**.

Shoib also said the members of the trust would meet soon to decide on the future course of action. In its verdict on November 9, 2019, the Supreme Court had mandated handing over of five-acre land to the Sunni Waqf Board at a prominent place in Ayodhya in lieu of the demolished structure in Ayodhya. In February 2020, the UP government announced allotment of land at Dhannipur village in Sadar tehsil of Faizabad in Ayodhya district, about 25 kilometres away from Ram Janambhoomi premises.

On July 29, the Sunni Waqf Board announced the names of nine members of the trust to take up the construction of the mosque.

'PM Modi to visit Ayodhya as planned'

New Delhi: Prime Minister **Narendra Modi**'s visit to Ayodhya to launch construction of the Ram temple on August 5 will remain unchanged, sources said.

There was speculation that there could be changes in the schedule after home minister Amit Shah tested positive for Covid-19 on Sunday. However, government sources confirmed that the event would go ahead as planned, adding that social distancing norms were strictly followed during the recent cabinet meeting chaired by the PM which was attended by Shah and other ministers. "There has been a strict protocol at the PM's residence in the last few months. Temperature checks, Aarogya Setu checks, no use of internal cars to ferry people are some of the measures adopted. Most physical meetings are avoided and video conferences are preferred," a source said, indicating that the PM's scheduled events will remain unchanged.

Asked specifically about the possibility of changes in the Ayodhya event, a senior Ram Tirth Trust member said there would not be any change as per PMO feedback. "Ministers were not being invited to the event anyway... From the Centre, only the PM was scheduled to be there for the launch of construction work," the trust member said. TNN

MHA: Need more time for CAA rules

Bharti.Jain@timesgroup.com

New Delhi: The home ministry has told a parliamentary standing committee that it will need three more months to frame Citizenship Amendment Act (CAA) rules.

Though CAA was passed by both Houses of Parliament on December 11 and a notification issued fixing January 10, 2020, as the date from which the Act would come into effect, the absence of rules has held up implementation of the law that seeks to confer citizenship to minorities from Pakistan, Bangladesh and Afghanistan who were forced to migrate to India for fear of religious persecution in their home country.

According to the manual on parliamentary work, rules for legislation should be framed within six months of the date of the President's assent or the standing committee on subordinate legislation should be approached for extension of time. The six-month period for framing CAA rules ended in mid-June. If the three-month extension sought is from then, it gives the home ministry time until mid-September to frame the rules. With the Supreme Court now resuming hearings on a full scale, the Centre is hoping the pending challenge against CAA will also be taken up. This may also provide some clarity for framing the rules and procedures.

Sources said additional time to frame CAA rules was sought from the parliamentary panel last week, as the ministry was preoccupied with other matters, including managing the Covid-19 crisis, for the past few months. The enactment of CAA had sparked widespread protests and sit-ins across the nation and also sparked off communal riots in Delhi in February.

In MP, 6 gang rape mother & daughter

Indore: A woman and her 12-year-old daughter were gangraped by six masked men as the woman's husband was held with a knife to his throat in MP's Burhanpur late on Friday night.

No suspect has been identified yet. Police are banking on forensic evidence for a breakthrough. Khargone range DIG Tilak Singh, who is supervising the investigation, has spoken to the family.

The family lives near a mine where the man works as a guard. The family was fast asleep when the men barged into their house and started beating the guard. They dragged the woman and child off to nearby field where they took turns to rape them. TNN

OFFICE OF THE PR.CHIEF COMMISSIONER OF INCOME TAX, GUJARAT,
2nd FLOOR, AAYKAR BHAVAN, ASHRAM ROAD, AHMEDABAD- 380 009.

PUBLIC NOTICE

Applications are invited for empanelment of **Senior Standing Counsels** to represent the Income tax department, Gujarat before the High Court and other Judicial Fora. Advocates, who are enrolled in the High Court as Advocates and are member of the Bar Council of High Court and preferably having experience in dealing with Income tax/ Direct tax matters, are invited to apply. The eligibility terms and conditions are as per Instruction No 7/2016 dated 07/09/2016 issued by the Government of India, Ministry of Finance (Department of Revenue), Central Board of Direct Taxes, New Delhi.

Copy of Instruction No 7/2016 can be downloaded from the website **www.incometaxindia.gov.in** and **www.incometaxgujarat.org** or can be collected from the O/o the Commissioner of Income tax (Judicial) Room No 329, 3rd floor, Aaykar Bhavan, Ashram Road, Ahmedabad 38 00 09.

The application form in Proforma- A1& Proforma A 2 of Annexure I (as applicable) along with the necessary documentary evidence, should be submitted in sealed cover to the O/o the Commissioner of Income tax (Judicial), Tapal Section, Room No 334, 3rd floor, Aaykar Bhavan, Ashram Road, Ahmedabad 38 00 09 on or before **17.08.2020 by 05.00 P.M.** For further clarification and information please contact- Tel No (079) 27541586 (Shri Prashant Kumar, ITO (HQ) (Judicial), Ahmedabad)

Sd/-
(Prashant Kumar)
Income-tax Officer(HQ)(Judicial)
For Pr. Chief Commissioner of Income tax,
Gujarat, Ahmedabad

Date : 03.08.2020

TOGETHER WE CONCEIVE,
TOGETHER WE ACHIEVE



YOGI ADITYNATH
HON'BLE CHIEF MINISTER, UTTAR PRADESH

UTTAR PRADESH SKILL DEVELOPMENT MISSION INVITES APPLICATIONS FOR EMPANELMENT OF PLACEMENT AGENCIES/FLEXI PARTNERS

SHRI KAPIL DEV AGRWAL
HON'BLE MINISTER OF STATE (INDEPENDENT CHARGE), VOCATIONAL EDUCATION & SKILL DEVELOPMENT

Uttar Pradesh Skill Development Mission i.e. UPSDM in its endeavor to transform the skilling landscape of the state offers opportunities of association to:
(I) Industrial establishments of manufacturing & service sector to become flexi training providers under Train & Gain model.
(II) Placement agencies/ service provider establishments to facilitate placement of trained youth in jobs under Groom & Grow model.
Request for Empanelment (RFE) document available for free downloading on UPSDM's Website i.e. www.upsdm.gov.in

SALIENT FEATURES
- Continuous process with no end date unless withdrawn
- RFE available at no cost
- No tender cost; No EMD
- No processing fee
- Minimum requisites
- No complex procedures

KEY ESSENTIALS FOR APPLICANT BODIES

FLEXI PARTNERS
1. Registration under Indian Companies act, 1956, as amended in 2013
2. Must be a registered legal entity
3. Subsidiaries or Trusts of mother organization are also eligible as per RFE provisions
4. Minimum turnover in last three consecutive years
   - INR 100 Cr for manufacturing units
   - INR 50 Cr for service sector units
5. Consistent positive net worth
6. Placement assurance of minimum 80% successful candidates in own or subsidiary units
7. Capacity to train minimum 500 candidates per year

PLACEMENT AGENCIES
1. Registration under Indian Companies act/ Partnership act
2. Proprietorship firms are also eligible
3. Must be a registered legal entity
4. Must be registered under GST Act
5. Consistent positive net worth
6. Minimum turnover Rs 50 lacs in three consecutive years from candidate placement and/or manpower services
7. Minimum placement of 5000 youth in last 3 years.
8. Must have organised 4 job fairs or conducted 2 placement drives in last 2 years
9. Must have placed at least 100 candidates in each job fair or through each placement drive

PREFERANCES & ADVANTAGES
- Priority in allocation of training targets to flexi partners
- No change in training Sector without prior consultation
- Placement agencies will be provided list of training providers & data of trained candidates
- Empanelled Placement agencies & training partners may evolve mutually agreeable terms of agreement for placement facilitation
- Placement agency get a skilled & duly certified manpower resource inventory
- More placements add to the credibility of the agency
- Outstanding performers felicitated at various fora/ occasions

1800-102-8056 (Toll free)
www.upsdm.gov.in facebook.com/UPSDMOfficial twitter.com/UPSDMOfficial
ADDRESS: UPSDM OFFICE, GOVT. ITI CAMPUS, ALIGANJ , LUCKNOW-226024

Government of Jharkhand
Jharkhand Rural Health Mission Society
Department of Health, Medical Education & Family Welfare, Namkum, Ranchi

Very Urgent rate contract notice for Covid-19 RT-PCR testing at private laboratories

Tender Notice No.:IDSP/2020/154-1346(MD) Date: 31.07.2020

Mission Director, Jharkhand Rural Health Mission Society, Department of Health & Family Welfare, Govt. of Jharkhand, Namkum, Ranchi, invites e-Tender from ICMR approved Private Labs in order to enter into a rate contract for Pick-up &RT PCR testing of COVID-19 samples collected by the districts as per ICMR guidelines.

Blank tender documents with detailed conditions can be viewed or downloaded by the bidders from the websitehttp://jharkhandtenders.gov.in and bid should be submitted through e-procurement system only. Hard copies of technical bid and financial bid will not be entertained exceptTender Fee &Earnest Money Deposit (EMD).

Final evaluation and finalization of Rate Contract will be based solely on e-bid submitted by the bidder. It will be sole responsibility of the bidder to scan and upload clear and legible documents for assessment, failing which the tender will be liable for rejection.

Sr. No.	Particulars	Details
1	Name of the work	Pick-up &RT PCR testing of COVID-19 samples-
2	Date of Publication of Tender on website	01-08-2020
3	Date / time for receipt of bids on website	Upto 10-08-2020 by 3.00 p.m.
4	Date/Time for opening of Technical bid through website	11-08-2020 at 11:00 AM
5	Email ID/Contact Person for clarifications	jharkhandcovid@gmail.com Procurement Incharge-9065527502
6	Tender Document Fee (Non-refundable)	Rs. 5,000/- (Rs. Five thousand only)
7	Earnest Money Deposit (EMD)	Rs. 2,50,000/- (Rs. Two lakh Fifty Thousand only)

Note: The specified dates and time may change due to abrupt declaration of holidays or any other unforeseen circumstances. The same shall be informed through web-portal as and when required.

Sd/-
Mission Director, JRHMS

PR 231415 (Jharkhand Rural Health Mission Society) 20-21 (D)

NATIONAL BOARD OF EXAMINATIONS
(Autonomous body of the M/o. Health & Family Welfare, Govt. of India)
NAMS Building, Medical Enclave, Ansari Nagar, New Delhi – 110029

NATIONAL ELIGIBLITY CUM ENTRANCE TEST – SUPERSPECIALTY (NEET-SS) 2020

NOTICE

National Board of Examinations shall conduct the NEET - SS 2020 on the 15th September 2020.

Please refer to the Information Bulletin at NBE website www.nbe.edu.in for eligibility criteria, fee structure, scheme of examination and other details.

Important Dates for NEET SS 2020	
Availability of Information Bulletin	3rd August 2020 onwards
Online Submission of the Application Form	3rd August to 23rd August 2020
Examination Date	15th September 2020
Declaration of the Result	by 25th September 2020

Candidate Care Support: 022 – 61087595; E-mail: helpdesknbeexam@gmail.com

DELTA CORP LIMITED
Regd. Off:- 10, Kumar Place, 2408, General Thimayya Road, Pune – 411 001 • **CIN No.** L65493PN1990PLC058817 • **Tel No.** 91-22-40794700 • **Fax No.** 91-22-40794777 • **Email ID:** secretarial@deltin.com • **Website:** www.deltacorp.in

NOTICE
NOTICE TO SHAREHOLDERS
TRANSFER OF EQUITY SHARES TO INVESTOR EDUCATION & PROTECTION FUND (IEPF)

Pursuant to Section 124 of the Companies Act, 2013 read with the IEPF (Accounting, Audit, Transfer and Refund) Rules, 2016, as amended from time to time, the Company is required to transfer the shares, in respect of which Dividend has remained unclaimed and unpaid consequently for seven consecutive years or more, to the Investor Education and Protection Fund (IEPF) Authority. In the case of Delta Corp Limited, the due date for transfer of such shares, in respect of which dividend has remained unclaimed and unpaid consequently for seven consecutive years or more is 4th November, 2020. Pursuant to the said Rules, the Company is sending individual communication to those shareholders whose shares have become due for transfer to IEPF. The Company has also uploaded the details of such shareholders on its website viz. **www.deltacorp.in**

Notice is further given to the shareholders to claim / encash the unpaid / unclaimed Dividend relating to financial year 2012-13 and onwards latest by 22nd October, 2020 so that the shares are not transferred to the IEPF. It may please be noted that if Dividend remains unclaimed/unpaid as on the due date, the Company will proceed to initiate action for transfer of shares of such shareholders.

On transfer of the Dividend and the shares to IEPF, the shareholders may claim the same by making an application to IEPF in Form IEPF-5 as per the Rules. The said Form is available on the website of IEPF viz. **www.iepf.gov.in**

For any queries on the above matter, Shareholders are requested to contact the Company's Share Transfer Agents, as mentioned below:
Freedom Registry Limited, Unit: Delta Corp Limited, Plot No. 101 / 102, 19th Street, MIDC, Satpur, Nasik - 422 007: 0253-2354032, 2363372
Email id: **support@freedomregistry.in**

For Delta Corp Limited
Sd/-
Dilip Vaidya
Company Secretary & GM - Secretarial
FCS No.: 7750

Place: Mumbai
Date: 03rd August 2020

शीतयुद्धाची आवई

विजय साळुंके

महासत्ता एकमेकांशी थेट लढत नाहीत. प्याद्यांकरवी एकमेकांना शह-काटशहाचा त्यांचा खेळ असतो. 'इंडो-पॅसिफिक'टापूत चीनला शह देण्यासाठीची जुळवाजुळव ट्रम्प यांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कितपत गंभीर आहे, हा प्रश्न आहेच.

गेल्या वर्षभरात नव्या शीतयुद्धाची चर्चा सुरू झाली आहे. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर (१९४५) अमेरिका आणि सोव्हिएत रशिया यांच्यात पहिले शीतयुद्ध सुरू झाले. ते १९९१ पर्यंत टिकले. लिओनिद ब्रेझनेव्ह यांनी अफगाणिस्तानात साम्यवादी दाऊदच्या राजवटीला आधार देण्यासाठी सोव्हिएत फौज पाठवली. अफगाणिस्तानमार्गे मॉस्को पश्चिम आशियातील तेलसंपन्न टापूवर नियंत्रणाचा प्रयत्न करणार, या शक्यतेने अमेरिकेने सौदी अरेबियासह जगातील अनेक (विशेषतः पश्चिम युरोपीय) देशांची मदत घेऊन मुजाहिद उभे केले. तेथे दहा वर्षांतील हानीमुळे सोव्हिएत अर्थव्यवस्था खिळखिळी झाली होती. त्यात मिखाइल गोर्बाचेव्ह यांच्या 'ग्लासनोस्त' आणि 'पेरेस्त्रोयका' या कार्यक्रमांमुळे संघराज्याची चौकट सैल झाली होती. शेवटी या महासत्तेची पंधरा शकले झाली. परिणामी अमेरिका ही एकमेव महासत्ता बनली. युरोपीय संघ, चीन अशा अन्य ध्रुवांची कल्पना मांडण्यास प्रारंभ झाला होता. सोव्हिएत रशियाकडून धोका कमी झाल्यानंतर पश्चिम युरोपीय देशांनी आपल्यातील ऐक्य व सहकार्यावर भर देत आर्थिक ताकद वाढविण्याचा प्रयत्न केला. अमेरिकेच्या दबावामुळे युरोपीय संघ व 'नाटो'चा (नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन) पूर्व युरोपातील पूर्वीच्या साम्यवादी देशांमध्ये विस्तार करण्यात आला. मदतीच्या मोठ्या अपेक्षेने तो स्वीकारण्यात आला होता. गेल्या काही वर्षांत युरोपीय संघातील ऐक्याला तडे जाण्याची चिन्हे दिसू लागली होती. ब्रिटन बाहेर पडले. २००८ च्या आर्थिक मंदीने ग्रीस, आयर्लंड, पोर्तुगाल, इटली आदी देशांचा भार संपन्न जर्मनी, फ्रान्सने उठविला. त्याची या देशांत प्रतिक्रिया म्हणून उजव्या शक्तींची वाढ झाली. आता करोनाच्या आघाताने फ्रान्ससारखा संपन्न देशही जेरीस आला आहे. अमेरिकेच्या पंखाखालून मुक्त होऊन नवी युरोपीय महासत्ता आकाराला येण्याची शक्यता मालवली आहे.

डोनाल्ड ट्रम्प जानेवारी २०१७ मध्ये अमेरिकेच्या अध्यक्षपदी आले. अवघी हयात आर्थिक लाभाचा विचार करणाऱ्या ट्रम्प यांच्यातील व्यापारी वरचढ असल्याने जागतिक सामरिक संतुलनाची त्यांना चिंता नव्हती. अमेरिकेने साम्यवादाचे भय दाखवीत आपला दबदबा वाढविला होता. नंतर सप्टेंबर २००१ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर इस्लामी दहशतवादाचा मुद्दा मिळाला. ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट'चा नारा देत जगभरच्या लष्करी जबाबदाऱ्या कमी करण्याचा निर्धार व्यक्त केला होता. इराक, अफगाणिस्तानमधील अमेरिकेच्या लष्करी मोहिमांमुळे देशाला साडेसहा हजार अब्ज डॉलर मोजावे लागले, असे ते म्हणत होते. हा सर्व अमेरिकी करदात्यांचा पैसा अमेरिकेने इराक आणि अफगाण जनतेवर उधळला नाही. अमेरिकी शस्त्रास्त्र उत्पादक कंपन्या, कंत्राटदार, प्रसारमाध्यमे, थिंकटँक यांनीच तो जिरवला होता. शीतयुद्धादरम्यानच्या काळात अमेरिकेने जगाच्या कानाकोपऱ्यात लष्करी तळ उभारले होते. त्यावर बराच खर्च झाला. शीतयुद्ध काळात अमेरिका युरोपीय व अन्य देशांना महागडी शस्त्रास्त्रे खरेदी करण्याला भाग पाडत असे. सोव्हिएत रशियाही या स्पर्धेत होताच. परंतु, मॉस्कोने वॉर्सा गटातील; तसेच भारत, इजिप्त वगैरे मित्र देशांना सवलतीने, स्वस्तात, उधारीवर शस्त्रास्त्रे विकली. शीतयुद्ध टिकविण्यात अमेरिका आणि पश्चिम युरोपीय शस्त्रास्त्र निर्मात्यांचे हितसंबंध होते.

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर अमेरिका आणि सोव्हिएत रशिया या दोन महासत्तांनी जागतिक सामरिक संतुलन टिकविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या छत्राखालील देशांना एकमेकांत लढविले. त्या एकमेकांशी रणभूमीवर थेट कधीच भिडल्या नाहीत. १९६२ मधील क्युबन क्रायसिसमध्ये त्यांच्यात ठिणगी पडण्याची शक्यता निर्माण झाली होती. परंतु, सोव्हिएत परराष्ट्रमंत्री आंद्रे ग्रोमिको यांची मुत्सद्देगिरी व जॉन केनेडी, निकिता ख्रुश्चेव्ह यांचा संयम यामुळे जगावरील अण्वस्त्रे युद्धाचे संकट टळले.

शीतयुद्धाचे बीज महायुद्धोत्तर काळात संयुक्त राष्ट्रांच्या रचनेतच पेरले गेले होते. विजयी सत्तांनी जर्मनीचे विभाजन केले; तसेच, आपल्यासाठी नकाराधिकारासारखा विशेष अधिकार घेतला होता. त्याद्वारे त्यांनी आपल्याविरुद्ध सामूहिक लष्करी कारवाईला शह देण्याची तरतूद करवून घेतली. त्यामुळेच अमेरिका, रशिया, चीन, ब्रिटन व फ्रान्स आपसांत कधी लढले नाहीत. अनेक मुद्द्यांवर अमेरिका, ब्रिटन व फ्रान्सने रशियाविरुद्ध आर्थिक व अन्य निर्बंध लादले. चीनचे विद्यमान सर्वेसर्वा शी जिनपिंग यांना त्याची जाणीव आहे. दक्षिण चीन समुद्रातील ९० टक्के टापूवर दावा सांगण्यापासून करोना विषाणूची माहिती दडवण्यापर्यंत अनेक बाबी त्यांनी पचविण्याचा प्रयत्न केला. ट्रम्प यांनी चीनबरोबरच्या व्यापारातील असंतुलनाचा मुद्दा ताणला खरा; परंतु, त्यात अमेरिकेतील अनेक कंपन्यांच्या हितसंबंधांना धोका पोचत असल्याने कथित व्यापार युद्धातील हवा निघून गेली. हुआवे या चिनी कंपनीचे फाइव्ह-जी तंत्रज्ञान सध्या रोखण्यात आले असले, तरी त्याचे पर्याय महागडे ठरणार असल्याने तो आवेशही फार काळ टिकणार नाही.

सोव्हिएत रशियाला शह देण्यासाठी रिचर्ड निक्स-हेन्री किसिंजर यांच्या पुढाकाराने चीनला उभारी देण्याचा प्रयत्न सुरू झाला. पाश्चात्य तंत्रज्ञान, आर्थिक गुंतवणूक व आपली मेहनत या जोरावर चीनने दुसऱ्या महासत्तेचा आकार घेतला. २०४९ पर्यंत अमेरिकेला सर्व क्षेत्रांत मागे टाकण्याचा शी जिनपिंग यांचा निर्धार आहे. त्यादृष्टीने त्यांचा आशिया, आफ्रिका व दक्षिण अमेरिकेत गुंतवणुकीद्वारे 'क्लायंट स्टेट' उभी करण्याचा प्रयत्न आहे. अमेरिकेचा आजचा 'जीडीपी' जागतिक 'जीडीपी'च्या २५ टक्के असला, तरी तो लवकरात लवकर गाठण्याच्या उद्दिष्टाला करोनाच्या साथीने अडथळा आला आहे. 'कोव्हिड-१९'चा फटका जगभरच असला, तरी त्यातून सावरण्याची क्षमता व इच्छाशक्ती चीनच्या नेतृत्वात आहे. चीनचा वाढता प्रभाव ही दक्षिण कोरिया, जपान, भारत, ऑस्ट्रेलिया; तसेच आग्नेय आशियातील अनेक देशांना चिंतेची बाब वाटत असली, तरी युरोपमध्ये ती फारशी दिसत नाही. सध्याच्या हलाखीतून सावरण्यासाठी त्यांना चीनच्या गुंतवणुकीचा आधार वाटतो.

शीतयुद्ध म्हणजे दोन महासत्तांचा आपापल्या प्रभावक्षेत्रात एकमेकांना शह-काटशह देण्याचा खेळ, अशी सोपी व्याख्या करता येईल. तो पहिल्या शीतयुद्धात जगाच्या कानाकोपऱ्यात खेळून झाला. चीनने आर्थिक व लष्करी ताकद मिळविल्यानंतर वर्चस्व गाजविण्यास सुरुवात केल्यापासून अमेरिकेत अस्वस्थता दिसू लागली. जोसेफ स्टॅलिननंतर निकिता ख्रुश्चेव्ह यांनी अमेरिकेला न भिडता शांततापूर्ण सहअस्तित्व हे धोरण स्वीकारले; तेव्हा माओने सोव्हिएत रशिया भांडवलशाहीकडे झुकला, शरण गेला अशी टीका केली होती. दंग ज्याव फिंग ते शी जिनपिंग यांनी आर्थिक विकासासाठी साम्यवादी चौकट भक्कम ठेवून भांडवलशाहीचा आधार घेतला. शी जिनपिंग यांना केवळ अमेरिकेवर मात करायची नाही, तर जगावर संपूर्ण वर्चस्व गाजवायचे दिसते. त्यांनी डोनाल्ड ट्रम्पसह अनेक जागतिक नेत्यांचा वकूब ओळखला आहे. दक्षिण चीन समुद्रातील चीनचा दावा हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाने फेटाळला असला, तरी फिर्यादी फिलिपिन्सने आपला हक्क प्रस्थापित करण्यासाठी चीनशी युद्ध करण्याची क्षमता नाही, अशी कबुली दिली आहे. चीनचे वर्चस्व वाढत जाणे म्हणजे आपल्या प्रभावक्षेत्राचा संकोच, हे ओळखून अमेरिका इंडो-पॅसिफिक फळीद्वारे चीनला शह देण्याचा प्रयत्न करीत आहे. चीनने बलाढ्य रशियाशी युद्धाचा धोका पत्करला, तसे अमेरिका करणार नाही. इतरांना लढवून आपला हेतू साध्य करण्यात तरबेज अमेरिका ट्रम्प असोत किंवा जो बायडन चीनशी रणांगणात थेट उतरणार नाही. लडाखमधील चीनच्या घुसखोरीचे निमित्त साधून भारताला आपल्या छायेखाली आणू पाहणारी अमेरिका प्रत्यक्ष युद्ध झाले तर महागडी शस्त्रे विकेल; पण आपले सैन्य भारताच्या बाजूने उतरविणार नाही. दक्षिण चीन समुद्रात दोन विमानवाहू नौका पाठवूनही चीन जुमानत नाही, यात अमेरिकेच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. 'कोव्हिड-१९' हाताळण्यातील गंभीर चुका, आर्थिक घसरण यामुळे ट्रम्प यांची बाजू कमजोर झाली आहे. त्यासाठी चीनबरोबरच्या शीतयुद्धाची आवई उठविण्यात आली आहे.

(लेखक आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

शिक्षण धोरणात सर्वांना न्याय

केंद्र सरकारने नव्या शैक्षणिक धोरणाला नुकतीच मान्यता दिली असून, त्यामध्ये शालेय शिक्षण, उच्च शिक्षण आणि संशोधनाच्या दृष्टीने अनेक महत्त्वाचे बदल सुचविले आहेत. या सर्वांवर 'बीएमसीसी'चे माजी प्राचार्य आणि 'सेडा'चे अध्यक्ष डॉ. अनिरुद्ध देशपांडे यांच्याशी 'महाराष्ट्र टाइम्स'चे प्रतिनिधी हर्ष दुधे यांनी साधलेला संवाद...

■ नव्या शैक्षणिक धोरणात शालेय शिक्षणात मोठ्या प्रमाणावर बदल करण्यात आले आहेत. याबाबत आपल्याला काय वाटते?

शालेय शिक्षणात मूलभूत बदलांची आवश्यकता होती. ती आवश्यकता नव्या शैक्षणिक धोरणात पूर्ण करण्यात आली आहे. शालेय शिक्षणाचा 'पॅटर्न' बदलला आहे. या नव्या ५+३+३+४ 'पॅटर्न'नुसार शालेय विद्यार्थ्यांना शिक्षण मिळणार आहे. त्यामुळे शालेय शिक्षणात एक प्रकारची समग्रता येणार आहे. यात आणखीन एक महत्त्वाची बाब म्हणजे इयत्ता पाचवीपर्यंत मातृभाषेतून शिक्षण देण्याचा निर्णय झाला आहे. या दोन्ही निर्णयामुळे बालकांच्या मेंदूचा विकास होण्यासाठी; तसेच त्यांच्या कल्पकतेला वाव देण्यासाठी खूप मदत होणार आहे. याच निर्णयात थोडा बदल करून, मुलांना मातृभाषेतून शिक्षण इयत्ता आठवीपर्यंत उपलब्ध करून दिल्यास देशातील मुलांच्या बुद्धिमत्तेचा विकास पाहायला मिळेल. या निर्णयामुळे इंग्रजी माध्यम किंवा इंग्रजी शाळांचे खच्चीकरण होईल असे अनेकांना वाटत आहे. मात्र, तसे काही होणार नाही. मातृभाषेसोबत इंग्रजीचे शिक्षणही घेता येणार आहे.

■ उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील बदलांबाबत काय सांगाल ?

उच्च शिक्षणात बहुशाखीय शिक्षणावर भर देण्यात आला आहे ही फारच चांगली बाब आहे. देशात उच्च शिक्षणाचा विकास मोठ्या प्रमाणात झाला मात्र विविधांगी शिक्षण शाखा नव्हत्या. आता या नव्या धोरणात प्रत्येक महाविद्यालय आणि आणि विद्यापीठात बहुशाखीय शिक्षणावर महत्त्व देण्यात आले आहे. या बहुशाखीय शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना टप्प्याटप्प्याने हवे ते आवडीचे शिक्षण घेता येणार आहे. या प्रक्रियेत एखाद्या विद्यार्थ्याला शिक्षण सोडून दुसरे काही शिकायची इच्छा झाल्यास त्याला ती संधी मिळणार आहे. उच्च शिक्षणात प्रामुख्याने त्रिस्तरीय विद्यापीठ बदल केले आहे. हे बदल तीन गटांत विभागले असून, मोठ्या गटात संशोधनाला महत्त्व देण्यात आले आहे, तर दुसऱ्या गटात संशोधन असेल मात्र शिक्षणावर अधिक भर देण्यात आला आहे. तिसऱ्या गटात महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याचे धोरण आखले आहे. या स्वायत्ततेच्या धोरणामुळे कॉलेजांना पदवी देता येणार येणार आहे. संशोधनाला वाव देण्यासाठी 'नॅशनल रीसर्च फाउंडेशन'ची स्थापना करणे हादेखील एक महत्त्वाचा बदल आहे.

■ 'नॅशनल रीसर्च फाउंडेशन' गेमचेंजर ठरेल असे वाटते का?

नॅशनल रीसर्च फाउंडेशनची स्थापना करून त्यासाठी दर वर्षी २० हजार कोटी रुपयांची तरतूद करणे हा संशोधन क्षेत्रात एक मोठा बदल जाणवतो. विद्यार्थी, संशोधक प्राध्यापक अशा तिन्ही घटकांना या निमित्ताने संशोधनाची उत्तम संधी प्राप्त होणार आहे. इतर देशांच्या तुलनेत आपल्या देशात संशोधनाची आणि त्यातून निर्माण होणाऱ्या पेटंटची संख्या खूप कमी आहे. 'नॅशनल रीसर्च फाउंडेशन'मुळे ही दरी कमी होण्यास हातभार लागणार आहे. देशातील पाली, प्राकृत, पर्शियन अशा प्राचीन भाषांचे संशोधन आणि विकास करण्यासाठी 'इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्स्लेशन अँड इंटरप्रीटेशन' स्थापन करण्याचा निर्णय महत्त्वाचा आहे. त्यामुळे प्राचीन भाषेतील ज्ञान सर्वांसाठी उपलब्ध होणार आहे. त्याचप्रमाणे भाषांचे पुनरुज्जीवन होईल, ही आपल्यासाठी चांगली बाब आहे.

■ शिक्षक आणि प्राध्यापकांसाठी महत्त्वाच्या योजना शैक्षणिक धोरणात आहेत. त्याबाबत काय सांगता येईल ?

एखाद्याला यापुढे शिक्षक व्हायचे असल्यास त्याला चार वर्षांचा इंटिग्रेटेड बीड अभ्यासक्रमच पूर्ण करावा लागणार आहे. त्यामुळे शिक्षक व्हायचे असल्यास एक किंवा दोन वर्षांचे अभ्यासक्रम न शिकता आता चार वर्षांचा अभ्यासक्रम शिकावा लागणार आहे. त्यामुळे ज्या व्यक्तीला शिक्षकच व्हायचे आहे, असेच व्यक्ती शिक्षण घेतील. त्याचप्रमाणे या संपूर्ण अभ्यासक्रमातून शिक्षक व्हायला उपयोगी पडणाऱ्या गुणांचा अधिक विकास होणार आहे. बीएड कॉलेज आंतरशाखीय शिक्षण देणारे होतील. त्यामुळे शिक्षकांना महत्त्व येईल. 'नॅशनल रीसर्च फाउंडेशन'चा फायदा प्राध्यापकांनाही होणार आहे. प्राध्यापकांना नवीन संशोधन करण्याला वाव मिळणार आहे.

■ धोरणाच्या अंमलबजावणीमुळे काय बदल होतील ?

नवीन शैक्षणिक धोरण सर्वंकष आहे. समाजातील सर्व स्तरांतील व्यक्तींना न्याय देणारे आहे. या धोरणात सामाजिक घटक, मुलींचे शिक्षण आणि महिलांकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. शालेय शिक्षणच्या पद्धतीत बदल करण्यात आल्याने, आर्थिक दुर्बल घटकांमधील आणि ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी फायदा होईल. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात संशोधनाला महत्त्व देण्यात आले आहे. महाविद्यालयीन स्तरावर शैक्षणिक स्वायत्तेला महत्त्व दिले आहे. त्याचप्रमाणे शिक्षणावर 'जीडीपी'च्या सहा टक्के आर्थिक तरतूद करण्याचा निश्चय करण्यात आला आहे. एकूणच समाजातील सर्व घटकांना न्याय देणारे हे शैक्षणिक धोरण असून, त्याचे आपण स्वागत करायला हवे.

नवे शिक्षण नवी दिशा
मटा टॉकटाइम

अर्थसंवाद

सार्वभौम सुवर्णरोखे आजपासून विक्रीला

प्रति ग्रॅम विक्री किंमत ५,३३४ रुपये

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

आर्थिक वर्ष २०२०-२१मधील सार्वभौम सुवर्णरोख्यांची पाचवी मालिका आज, सोमवारपासून (३ ऑगस्ट) गुंतवणुकीसाठी उपलब्ध होणार आहे. एकूण सहा टप्प्यांत हे रोखे विक्रीला येणार आहेत. दरमहिन्याला एक याप्रमाणे एकेका टप्प्यात सुवर्णरोख्यांची विक्री केली जाणार आहे.

या योजनेमध्ये ७ ऑगस्टपर्यंत गुंतवणुकीची संधी उपलब्ध होणार आहे. या योजनेंतर्गत प्रति ग्रॅम सोन्याची किंमत ५,३३४ रुपये इतकी निर्धारित करण्यात आली आहे. या गुंतवणुकीसाठी जे गुंतवणूकदार ऑनलाइन अर्ज करतील आणि डिजिटल पेमेंट करतील त्यांना प्रति ग्रॅम ५० रुपयांची सवलत मिळणार आहे. तत्पूर्वी, ८ ते १२ जून या कालावधीत तिसऱ्या मालिकेतील सोन्याच्या रोख्यांची प्रति ग्रॅम ४,६७७ रुपयांनी विक्री करण्यात आली होती.

इच्छुक गुंतवणूकदारांना स्मॉल फायनान्स बँका व पेमेंट बँका वगळता अन्य सर्व बँकांतून हे रोखे खरेदी करता येतील. तसेच स्टॉक होल्डिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि अधिकृत पोस्ट कार्यालयांतूनही हे रोखे विक्रीसाठी उपलब्ध असतील. याखेरीज राष्ट्रीय शेअर बाजार (एनएसई) आणि मुंबई शेअर बाजार (बीएसई) येथूनही सुवर्णरोख्यांची खरेदी करता येईल. सुवर्णरोख्यांचा कालावधी आठ वर्षांचा असून, कालावधी पूर्ण होण्याआधी या रोख्यांची विक्री करायची झाल्यास ती कालावधीच्या पाचव्या वर्षापासून करता येईल. किमान गुंतवणूक एक ग्रॅम सोन्याच्या युनिटमध्ये, तर कमाल गुंतवणूक चार किलो सोन्याच्या युनिटमध्ये करता येईल. सरकार या रोख्यांवर २.५ टक्के व्याज देणार आहे. हे सुवर्णरोखे शेअर बाजारात सूचिबद्ध असणार आहेत.

२.५० टक्के व्याज

सार्वभौम सुवर्णरोखे योजनेच्या इश्यू प्राइसवर दर वर्षी २.५० टक्के दराने निश्चित व्याज मिळते. व्याजाची रक्कम दर सहा महिन्यांनी गुंतवणूकदाराच्या खात्यात जमा केली जाते. सोनेखरेदी आणि गोल्ड ईटीएफमध्ये अशाप्रकारचे फायदे मिळत नाहीत. एनएसईच्या वेबसाइटवर दिलेल्या माहितीनुसार या योजनेतील गुंतवणुकीवर ८ वर्षांच्या मुदतपूर्तीनंतर मिळणाऱ्या लाभावरही कोणताही कर आकारला जात नाही. दर सहा महिन्यांनी मिळणाऱ्या व्याजावरही टीडीएस आकारला जात नाही.

४ किलोपर्यंत सोनेखरेदी

कोणीही गुंतवणूकदार एका आर्थिक वर्षात १ ग्रॅमपासून कमाल चार किलोपर्यंत सोन्याच्या किमतीचे रोखे खरेदी करू शकतो. कोणत्याही ट्रस्टसाठी सोनेखरेदीची कमाल मर्यादा २० किलो आहे. या रोख्यांचा मुदतपूर्तीचा कालावधी ८ वर्षांचा आहे. मात्र, गुंतवणूकदारांना दर पाच वर्षांनी बाहेर पडण्याची संधी दिली जाते.

सुवर्णरोख्यांविषयी...

- रोख्यांची खरेदी करताना किमान एक ग्रॅम सोने रोखे स्वरूपात खरेदी करणे आवश्यक आहे.
- त्यामुळे अर्थातच किमान गुंतवणूक एक ग्रॅम सोन्याच्या रोख्यांसाठी निश्चित केलेल्या भावाइतकी करावी लागेल.
- एक ग्रॅम सोन्यासाठी सुवर्णरोखा खरेदी केल्यास तो ९९९ शुद्धतेच्या एक ग्रॅम सोन्याचे प्रतिनिधीत्व करतो.
- गुंतवणूकदारांना सुवर्णरोख्यांतील गुंतवणुकीवर दरसाल २.५ टक्के व्याज दिले जाईल.
- या रोख्यांवर दिल्या जाणाऱ्या व्याजावर उगमकर (टीडीएस) कापला जाणार नाही.
- या रोख्यांची मुदतपूर्ती झाल्यावर मिळणाऱ्या रकमेवर भांडवली लाभ होत असेल तर त्यावर कर लागू होणार नाही.
- सुवर्णरोख्यांचा मुदतपूर्ती कालावधी आठ वर्षांचा असतो.
- कालावधी पूर्ण होण्याआधी रोखे बाजारात विकल्यास त्यावर मिळणारा भांडवली लाभ करपात्र असतो.

गुंतवणुकीसाठी योग्य पर्याय

सोन्यामध्ये गुंतवणूक करण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी हा एक चांगला पर्याय आहे. दुकानांमधून खरेदी करण्यात येणाऱ्या सोन्यावर घडणावळ शुल्क अर्थात मेकिंग चार्जेस द्यावे लागतात. सोन्याच्या किमतीवर तीन टक्के आणि मेकिंग चार्जेसवर ५ टक्के जीएसटी आकारला जातो. त्यामुळे सोन्याच्या किमतीत वाढ होते. मात्र, सार्वभौम सुवर्णरोखे योजनेतील सोनेखरेदीवर कोणत्याही प्रकारचा कर लागू होत नाही. हे रोखे असल्याने त्यावर मेकिंग चार्जही लागू होत नाही.

रेपो दरकपातीबाबत तज्ज्ञांमध्ये मतभिन्नता

मुंबई : रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची तीनदिवसीय बैठक ४ ते ६ ऑगस्ट या कालावधीत मुंबईत होत आहे. या बैठकीच्या अखेरच्या दिवशी म्हणजे ६ ऑगस्टला ऑगस्ट व सप्टेंबरसाठीचे पतधोरण रिझर्व्ह बँकेकडून जाहीर करण्यात येईल. या पतधोरणात रेपो दराबाबत रिझर्व्ह बँक काय निर्णय घेते याकडे अर्थजगताचे लक्ष लागले आहे.

करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर देशाची अर्थव्यवस्था कोलमडल्याने रिझर्व्ह बँकेने यापूर्वीच मोठ्या प्रमाणावर रेपो दरात कपात केली आहे. त्यामुळे या पतधोरणात रेपो दरात कपातीचा निर्णय घेतला जाणार नाही, असे मत काही अर्थतज्ज्ञ व बँकर्सनी व्यक्त केले आहे. दुसरीकडे रेपो दरात कपात केल्यानंतरही अर्थव्यवस्थेने अपेक्षित वेग धरला नसल्याने बँकेकडून आणखी रेपो दरकपात झाल्यास ते आश्चर्याचे ठरणार नाही, असे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे.

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्या नेतृत्वाखाली ही बैठक होणार आहे. आर्थिक गाडा सुरळीत होण्यासाठी रिझर्व्ह बँकेने यापूर्वी केलेल्या उपाययोजनांचा कितपत लाभ झाला, विविध क्षेत्रांतील सद्यस्थिती, त्यांच्या गरजा आदी मुद्द्यांचा या बैठकीत आढावा घेण्यात येणार आहे. या सर्व बाबींचा विचार केल्यानंतर दोन महिन्यांचे पतधोरण निश्चित केले जाणार आहे.

स्टेट बँकेतर्फे वेळोवेळी जाहीर करण्यात येणाऱ्या इकोरॅप या संशोधन अहवालात संभाव्य दरकपातीची शक्यता फेटाळून लावली आहे. 'रिझर्व्ह बँकेने रेपो दरात यापूर्वीच १.१५ टक्क्यांची (११५ बेसिस पॉइंट्स) कपात केली आहे. नवीन कर्जांवरील व्याजदरात ७२ पॉइंट्सची कपात करून अनेक बँकांनी या दरकपातीचा लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचवला आहे.

टपाल कार्यालयांचे बँकेत रूपांतर?

निती आयोगाचा केंद्राला प्रस्ताव

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

आर्थिक सर्वसमावेशकता वाढविण्यासाठी निती आयोगाने देशभरातील टपाल कार्यालयांचे रूपांतर टपाल बँकेत करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारला सादर केला आहे. या शिवाय आयोगाने ग्रामीण बँकांचेही (आरआरबी) अन्य बँकांमध्ये विलीन रण्याची शिफारस केली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार निती आयोगाने पंतप्रधान कार्यालय आणि केंद्रीय अर्थ मंत्रालयासमोर या विषयीचा अहवाल सादर करून अनेक शिफारशी केल्या आहेत. त्यानुसार देशातील दीड लाखांहून अधिक टपाल कार्यालयांचे रूपांतर टपाल बँकेत करण्याची आवश्यकता असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या खासगीकरणावरून आगामी काळात केंद्र सरकारला विरोधकांच्या टीकेचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. या शिवाय बँक कर्मचाऱ्यांच्या संघटनाही रस्त्यावर उतरून आंदोलने करण्याची दाट शक्यता आहे. नुकत्याच विलीन करण्यात आलेल्या बँका एक एप्रिलपासून अस्तित्वात आल्या आहेत. सध्या देशात सार्वजनिक क्षेत्रातील १२ बँका आहेत. २०१७मध्ये या बँकांची संख्या २७ होती. मे महिन्यात आत्मनिर्भर पॅकेजची घोषणा करताना केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन यांनी सरकार लवकरच नवे पब्लिक सेक्टर एंटरप्राइझ धोरण आणणार असून, त्याअंतर्गत सर्व क्षेत्रे खासगी क्षेत्रासाठी उघडण्यात येतील असे नमूद केले होते.

महाबँकेच्या खासगीकरणाचा प्रस्ताव

निती आयोगाने केंद्र सरकारला केलेल्या शिफारशीत सार्वजनिक क्षेत्रातील तीन बँकांच्या खासगीकरणाचा प्रस्ताव आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार निती आयोगाने केंद्र सरकारला बँक ऑफ महाराष्ट्र (महाबँक), पंजाब अँड सिंध बँक आणि युको बँक आदी तीन बँकांच्या खासगीकरणाचा प्रस्ताव दिला आहे. सध्या केंद्र सरकारतर्फे बँकांमध्ये अतिरिक्त गुंतवणूक करण्याचा विचार असतानाचा निती आयोगाने अशा प्रकारचा प्रस्ताव दिला आहे. या शिवाय केंद्र सरकार बँकिंग आणि विमा क्षेत्रासाठी नवे गुंतवणूक धोरण आणण्याचाही विचार करीत आहे.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, **मित्तल इंटरनॅशनल**, पुणे यांच्या **'सन प्रेस्टिज'**, स. नं. ५७/४, मौजे वडगांव बुद्रुक, मुंबई – बेंगळूरू हायवे, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील रहिवासी गृहप्रकल्पास राज्य शासनाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, महाराष्ट्र यांचे दि. २७ मे २०२० रोजीची मिटींग क्र. १९८ मध्ये प्रकरण क्र. SEIAA-STATEMENT-0000003721 करीता SEIAA-MINUTES-0000003211अन्वये पर्यावरणविषयक परवानगी क्र. SEIAA-EC-0000002275 अन्वये दि. २४/०६/२०२० रोजी मिळालेली आहे. ही परवानगी पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना, २००६ नुसार देण्यात आलेली आहे.

सदर परवानगीच्या प्रती महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ येथे उपलब्ध असून पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संकेतस्थळावर http://ec.maharashtra.gov.in उपलब्ध आहेत.

अमेय नितीन खुटाळे (ॲडव्होकेट)
फ्लॅट क्र. १०१, अर्जुन पॅराडाईज,
रायकर मळा, धायरी, पुणे – ४१.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, **जिंदल मित्तल इन्फ्रास्ट्रक्चर**, पुणे यांच्या **'सन क्रेस्ट'**, स. नं. ११६/७ व ११७/१अ, मौजे धायरी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील रहिवासी गृहप्रकल्पास राज्य शासनाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, महाराष्ट्र यांचे दि. २७ मे २०२० रोजीची मिटींग क्र. १९८ मध्ये प्रकरण क्र. SEIAA-STATEMENT-0000003717 करीता SEIAA-MINUTES-0000003212 अन्वये पर्यावरणविषयक परवानगी क्र. SEIAA-EC-0000002277,दि. २४/०६/२०२० रोजी मिळालेली आहे. ही परवानगी पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचना, २००६ नुसार देण्यात आलेली आहे.

सदर परवानगीच्या प्रती महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ येथे उपलब्ध असून पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संकेतस्थळावर http://ec.maharashtra.gov.in उपलब्ध आहेत.

अमेय नितीन खुटाळे (ॲडव्होकेट)
फ्लॅट क्र. १०१, अर्जुन पॅराडाईज,
रायकर मळा, धायरी, पुणे – ४१.

मध्य रेल्वे
पुणे मंडळ
ई-निविदा सूचना

ई-निविदा सूचना क्र. DRM-W-PA-E-Tend-२०२०-७-१-२ दि. ३१.०७.२०२०. भारताच्या राष्ट्रपतीसाठी आणि त्यांच्या वतीने विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य), मध्य रेल्वे, पुणे, वेबसाइट **www.ireps.gov.in** द्वारे पुढील कार्यासाठी खुली ई-निविदा आमंत्रित करीत आहेत.

१) एडीईएन / डीडी अंतर्गत एसएसई / पीडब्ल्यू / डीडी विभागांतर्गत विविध पी. वे. कार्य कामाची अंदाजित खर्च : रु. १,०१,१९,४२९.५६/- ईसारा रक्कम : रु. २,००,६००.००/- निविदा अर्जाची किंमत : रु. ५०००.००/- पूर्णत्वाचा कालावधी - १२ महिने.

२) एडीईएन / डीडी अंतर्गत एसएसई / पीडब्ल्यू / यूआरआय विभागांतर्गत विविध पी. वे. कार्य अंदाजित खर्च : रु. १,४७,२४,१५७.९३/- ईसारा रक्कम : रु. २,२३,६००.००/- निविदा अर्जाची किंमतः रु. ५०००.००/- पूर्णत्वाचा कालावधी - १२ महिने.

टीपः वरील नमूद ई-निविदाची निविदा अंतिम तारीख आणि वेळ : दि. २४.०८.२०२० रोजी १५.१५ वाजेपर्यंत आहे. १) नियोजित निविदाकारांना विनंती करण्यात येते की, निविदेचे तपशील व शुद्दीपत्रक, जर कोणतेही असल्यास **www.ireps.gov.in**या वेबसाइटला भेट द्यावी. २) निविदाकार वरील ई-निविदेत केवळ वेबसाइट **www.ireps.gov.in** द्वारे इलेक्ट्रॉनिकली सहभाग घेऊ शकतात आणि ई-निविदेकरीता मॅन्युअल प्रस्ताव सादर करण्याची परवानगी नसेल, मॅन्युअल निविदा सादर केल्यास ती स्वीकारण्यात येणार नाही. ३) निविदा दस्तऐव